**<u>Time Bound</u>**

# क. सांख्यिकी/०७/२०१३

<u>परिपत्रक :-</u>

विषय : <u>टंचाईग्रस्त गावातील पदव्युत्तर (P.G.) अभ्यासक्रम शिकणा-या विद्यार्थ्यांची सविस्तर माहिती ऑन लाईन करणेबाबत.</u>

संदर्भ : <u>क, उशिसं/२०१३( /१२)टंचाईग्रस्त/पदव्युत्तर/१४अई दिनांक १२ फेब्रुवारी, २०१३</u>

सर्व विद्यापीठ विभाग प्रमुख व सर्व प्राचार्य पदव्युत्तर (P.G.) महाविद्यालये यांचे लक्ष शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पूणे यांच्या वरील संदर्भिय पत्राकडे वेधण्यात येते.

सदर परिपत्रकांनुसार सोबत असलेल्या शिक्षण संचालकांच्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे विभागाशी/महाविद्यालयाशी संबंधित असून फक्त पदव्युत्तर विद्यार्थ्यांबाबतची माहिती (वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून) तातडीने भरून आजच दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत pg.dhepune.info या ऑनलाईन पोर्टलवर भरावयाची आहे तसेच त्याची एक प्रत उपकुलसचिव, सांख्यिकी विभाग (२०२), मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे पाठविण्याची **<u>तात्काळ</u>** व्यवस्था करावी.

सही/-

कुमार खैरे
(कुलसचिव)

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १३ फेब्रुवारी, २०१३

प्रत : १) सर्व विद्यापीठ विभाग प्रमुख
२) पदव्युत्तर महाविद्यालय

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.

Web : www.dhepune.gov.in E-mail : dhepune@yahoo.co.in,
फोन नं. ०२०/२६१२२१११, २६१३०६१७, २६१२४६२९

क्र उशिसं / २०१३( /१२) /टंचाईग्रस्त/पदव्युत्तर/१४ अई दि. १२ फेब्रुवारी, २०१३

**अत्यंत महत्वाचे / कालमर्यादित / लक्षवेध कुलसचिव**

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे
सर्व अभिमत विद्यापीठे.

PU Aff Statistic TAH 12/2/13

**विषयः- टंचाईग्रस्त गावातील पदव्युत्तर (P.G.)अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची सविस्तर माहिती ऑन लाईन भरण्याबाबत.**

शासन निर्णय दिनांक ९ जानेवारी, २०१३ व २१ जानेवारी, २०१३ अन्वये राज्यातील टंचाईग्रस्त गावांची नावे जाहीर करण्यात आलेली आहेत. शासनाने जाहिर केलेल्या टंचाईग्रस्त गावातील पदव्युत्तर अभ्यासक्रम (P.G.)शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती तातडीने मा. मंत्रीमहोदय यांनी शासनास सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार आपल्या विद्यापीठातील व विद्यापीठाशी संलग्नित शासकीय, अशासकीय महाविद्यालये (अनुदानित, विना अनुदानित, कायम विना अनुदानित ) यात पदव्यूत्तर अभ्यासक्रमात (कला, वाणिज्य,विज्ञान, विधी, अध्यापक, अभियांत्रिकी, औषध निर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र इ.) (वैद्यकीय अभ्यासक्रम वगळता ) शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांची टंचाईग्रस्त गावातील विद्यार्थ्यांची सविस्तर माहिती तातडीने **pg.dhepune.info** या ऑन लाईन पोर्टलवर भरावयाची आहे.

**ऑन लाईन पोर्टल ओपन करण्याकरिता www./ http इ. लावण्याची आवश्यकता नाही.** याबाबत दि.११-०२-२०१३ रोजी संचालनालय पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस उपस्थित आपल्या विद्यापीठांचे प्रतिनिधी यांना कार्यवाही बाबतच्या आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत. टंचाईग्रस्त गावाच्या नावांची यादी या पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याच गावातील विद्यार्थ्यांची माहिती ऑन लाईन पोर्टलवर भरावयाची आहे. इतर गावातील विद्यार्थ्यांची माहिती भरण्याची आवश्यकता नाही.

सदरची कार्यवाही ही कालमर्यादित पुर्ण करावयाची आहे. या साठी विद्यापीठातील विद्यार्थ्यांची माहिती भरण्याकरिता स्वतंत्र व्यक्तीची नियुक्ती करावी. तसेच संलग्नित महाविद्यालयातील पदव्यूत्तर अभ्यासक्रमातील टंचाईग्रस्त गावातील विद्यार्थ्यांची माहिती संबंधित महाविद्यालयाकडून भरुन घेण्यासाठी महाविद्यालयाच्या संख्येनुसार किमान तीन ते पाच स्वतंत्र व्यक्तींची नियुक्ती करावी.

आपल्या विद्यापीठाच्या अखत्यारितील ज्या महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविला जात असेल त्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची माहिती भरण्याबाबतच्या सुचना तातडीने ऑन लाईन / दुरध्वनीद्वारे सर्व महाविद्यालयांना देण्यात याव्यात. तसेच याबाबतच्या सूचना आपल्या वेबसाईटवर देखील देण्यात याव्यात. **सदरची माहिती कोणत्याही परिस्थितीत दि.१३-०२-२०१३ पर्यंत विद्यापीठांनी व महाविद्यालयांनी ऑन लाईन पोर्टलमध्ये भरुन सादर करावयाची आहे.**

**दि.१३-०२-२०१३ रोजी सायं.६.००वाजता उक्त माहीतीचा मा. मंत्रीमहोदय (उच्च व तंत्र शिक्षण) आढावा घेणार आहेत. त्यामुळे वेळेचे कालमर्यादेचे अनुपालन करण्याची जबाबदारी कुलसचिव यांनी घ्यावी.**

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता.